MHJN050003522026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५३/२०२६**
**सुरेश दुगाने व इतर वि. निरंक**

**<u>आदेश निशाणी क्र.०१ वर</u>**
**(पारीत दिनांक १३/०५/२०२६)**

अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन्स VIII, १८२७ चे कलम ३ व ७ अन्वये वारसा दाखला मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जातील शपथेवरील कथन वाचले. अर्जदारांनी सादर केलेल्या दस्तऐवजांची पाहणी केली. अर्जदारांच्या वकीलांचे म्हणणे ऐकले.

३) अर्जात असे नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई नामे **सारजाबाई साहेबराव दुगाणे** ह्या दिनांक १०/०३/२०२४ रोजी मौजे मापेगाव बु., ता. परतूर, जि. जालना येथे मयत झाली आहे. तसेच, अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील नामे **साहेबराव रंगुजी दुगाणे** हे देखील दिनांक १२/०१/२०१४ रोजी मौजे मापेगाव बु., ता. परतूर, जि. जालना येथे मयत झाला आहे. अशाप्रकारे अर्जदार हेच मयत **सारजाबाई साहेबराव दुगाणे** यांचे कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त त्यांना कुणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामाकरीता मयत **सारजाबाई साहेबराव दुगाणे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा दाखला मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज सादर केला आहे.

४) अर्जदारांच्या उपरोक्त मागणी संदर्भात, दिनांक २५/०३/२०२६ रोजी

**'जगमित्र'** या दैनिक वृत्तपत्रात निशानी क्र.१७ अन्वये जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. परंतु, अर्जदारांच्या उपरोक्त मागणीला आजतागायत कोणाचाही आक्षेप नोंदविण्यात आलेला नाही.

५) अर्जदारांनी अर्जाच्या सबुतीकरीता मयत **सारजाबाई साहेबराव दुगाणे** हिच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत निशाणी क्र.१२ वर दाखल केली. तसेच, अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या आधार कार्डाच्या पडताळणी केलेल्या प्रती निशाणी क्र.११, १३ ते १६ वर दाखल केल्या आहेत.

६) अर्जदार क्र.१ **सुरेश साहेबराव दुगाणे** याने त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल केले असून अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार निरंक असल्यामुळे साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आला नाही. त्यामुळे अर्जदारांचे शपथेवरील कथन अबाधित राहीले. त्याचप्रमाणे, अर्जदारांनी न्यायालयासमक्ष केलेले कथन तसेच, तोंडी व कागदोपत्री पुराव्याला आव्हान देण्याकरीता कोणीही न्यायालयासमक्ष आक्षेपक म्हणून हजर झाले नाही. त्यामुळे अर्जदारांची कथने व पुरावे अबाधित राहीले.

७) उपरोक्त परिस्थिती विचारात घेता निशाणी क्र.१२ वर दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्रान्वये **सारजाबाई साहेबराव दुगाणे** ह्या दिनांक १०/०३/२०२४ रोजी मौजे मापगोव बु., ता. परतूर, जि. जालना येथे मयत झाल्याची दिसून येते. त्याचप्रमाणे, अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयताचे इतर कुणीही कायदेशीर वारस असल्याची बाब

न्यायालयासमक्ष आलेली नाही. त्यामुळे अर्जदार हेच **सारजाबाई साहेबराव दुगाणे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. करीता, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार हेच मयत **सारजाबाई साहेबराव दुगाणे** यांचे कायदेशीर वारस आहे, अशी औपचारीक मान्यता (Formal Recognition) देण्यात येते.

३) येणेप्रमाणे अर्जदारांनी कोर्ट फी भरल्यानंतर औपचारीक मान्यतेचे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४) सदर औपचारीक मान्यतेचे वारसा दाखला हे मयताच्या स्थावर किंवा जंगम मालमत्तेत (मुल्यांकनानुसार महाराष्ट्र कोर्ट फी कायद्याचे परिशिष्ट १ मधील कलम १२ नुसार योग्य ती कोर्ट फि भरल्याशिवाय) हक्क प्रस्थापित करण्याकरीता किंवा अर्जदारांच्या नावे फेरफार करण्याकरीता उपयुक्त राहणार नाही किंवा ग्राह्य धरण्यात येवू नये. तसेच, या वारसा दाखल्याच्या आधारे मयताच्या बँक खात्यातील प्रलंबित रक्कमेची उचल करता येणार नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2026.05.13 15:04:07 +0530

**स्थळ** : परतूर
**दिनांक** : १३/०५/२०२६

**(व्ही. बी. डोंबे)**
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),
परतूर

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

Name of Stenographer :- M. D. Adhe

Court Name :- V. B. Dombe,
Civil Judge (J.D.), Partur

Order dictated on :- 13.05.2026

Transcription ready on :- Direct on Computer

Order signed by P.O. on :- 13.05.2026

Order uploaded on :- 13.05.2026

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MADHAV DEVIDAS ADHE
Date: 2026.05.13 15:05:43 +0530

(Madhav D. Adhe)
Stenographer Grade-3